**सं.फौ.ख.क्र. २७३८/२०१६**
**शासन विरुद्ध तुषार**
**निशाणी क्र. ५४ वर पुढे**

**निशाणी क्र.७८ वरील आदेशान्वये साक्षीदार क्र.९ याचा शपथेवर उलटपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. पी. डी. बेंद्रे यांचेमार्फत शपथेवर सुरु -**

**०२.** मी लोणी येथे २० ते २२ वर्षांपासून राहतो. वजिर इब्राहिम बेग हे माझे कोणीही नाही. मी दिनांक १०/०८/२०१६ रोजी पोलीस ठाण्यात गेलो. मला जायभाय पोलीस अधिकारी यांनी पोलीस ठाण्यात बोलावले होते. जायभाय पोलिस माझ्या दुकानावर त्यांची मोटारसायकल दुरूस्तीला येत असत. मी पोलीस ठाण्यात असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वाहन दुरूस्ती करत असे. दिनांक १०/०८/२०१६ रोजी कोणता वार होता हे मला आता सांगता येणार नाही.

**०३.** पंचनामा फॉरेक्स व इंडीका गाडीचा झाला. त्यांचे क्रमांक मला आता निश्चित सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जायभाय माझे परिचित असल्याने त्यांनी माझ्या दुकानात येऊन माझी सही घेतली. त्या गाड्या पोलीस ठाण्यात प्रवेशद्वाराच्या बाजूलाच लावल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकूर खरा असल्याचे मी खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष दिली.

<u>उलटतपास - संपुर्ण.</u>

**फेरतपास - काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

SANTOSH RAMAKANT BHARAD
Digitally signed by SANTOSH RAMAKANT BHARAD
Date: 2025.09.22 17:38:02 +0530

राहाता.
दिनांक - २२/०९/२०२५

(संतोष र. भरड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायालय क्र.२), राहाता.